पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)
पी. जी. प्रवेश विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/पीजीप्रवि/२०२१/ 8761

दिनांक: 30 NOV 2021

## सुधारित परिपत्रक

प्रति

(१) मा. संचालक/संचालिका
विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर

(२) मा. प्राचार्य/प्राचार्या
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर

**विषय: विद्यापीठ क्रीडा निधी व इतर शुल्क (सवलत दिलेली) जमा करुन विद्यापीठाकडे पाठविणेबाबत...**

संदर्भ: १) विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/पीजीप्रवि/२०२१/५५७०, दि. ०५/०८/२०२१
२) विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/पीजीप्रवि/२०२१/५७११, दि. ०७/०८/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आदेशान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ अन्वये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील व विद्यापीठ संकुलातील सर्व विद्याशाखांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्क (Tuition Fee) व इतर शुल्क (Other Fees) बाबत दि. १०/०७/२०२१ रोजीच्या विद्यापरिषदेतील ठराव क्र. १०२ अन्वये अंतिम मान्यता दिलेनुसार शै. वर्ष २०२१-२२ पासून लागू करणेबाबत कळविण्यात आलेली आहे.

तथापि संदर्भ क्र. २ अन्वये कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे व मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी निर्देशित केलेनुसार आणि दि. १०/०७/२०२१ रोजीच्या विद्यापरिषद बैठकीतील ठराव क्र. १३४ (१) नुसार सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता काही शिर्षकांच्या शैक्षणिक शुल्कातील सवलत देण्यात आली होती.

परंतु कोरोनाच्या प्रादूर्भावानंतर पुनश्च: संलग्नित महाविद्यालये व संकुले सुरु झालेली असून, क्रीडा विभागाकडून विविध खेळांच्या स्पर्धाकरीता संघ रवाना होत आहेत. त्यानुषंगाने मा. कुलगुरु महोदया व मा. कुलसचिव यांनी आदेशीत केलेनुसार यापूर्वी उक्त संदर्भ पत्र क्र. २ अन्वये दिलेली शुल्कामधील सवलत बंद केलेली आहे. तरी सदरचे शुल्क सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुले प्रमुखांनी खालील प्रमाणे विद्यार्थ्यांकडून चालू सत्रात शुल्क स्विकारुन विद्यापीठाकडे सदरची रक्कम पाठविण्यात यावी.

पुढील पानावर-

| अ.क्र. | शिर्षक | शुल्क | अ.क्र. | शिर्षक | शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा शुल्क- | कोर्सनिहाय | ७ | जिमखाना शुल्क | १५०/- |
| २ | ग्रंथालय शुल्क | ५००/- | ८ | विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क | ३०/- |
| ३ | प्रो-रेटा/विद्यापीठ क्रीडा निधी | ६०/- | ९ | विद्यापीठ वैद्यकीय निधी | १०/- |
| ४ | महाविद्यालय विकास निधी | ७५/- | १० | इंधन शुल्क | ५०/- |
| ५ | कॉलेज मॅगजीन शुल्क | ५०/- | ११ | संगणक प्रशिक्षण शुल्क | १५०/- |
| ६ | युवा महोत्सव | १२०/- | १२ | Alumni Association Fee | ५०/- |

तसेच संदर्भ क्र. १ अन्वये सर्व संकुले व महाविद्यालये यांना कळविलेप्रमाणे यापुढे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारणी करण्यात यावे, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

(डॉ. सु. कि. पवार)
प्र.कुलसचिव

प्रति माहितीस्तव:

१) मा. कुलगुरु कार्यालय, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
3) मा. कुलसचिव कार्यालय, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
4) मा. वित्त व लेखाधिकारी, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
5) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
6) क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, ज्ञानस्त्रोत केंद्र
७) सर्व प्रशासकीय विभाग